**Newspaper: Maharashtra Times**

**Published on February 11th 2026**

A news item covering the exhibition organized by the Second-Year students from all programs who opted for Sanskrit at R.A. Podar College. The exhibition was held in the College Main Hall on 7th February 2026 and showcased hand-made and hand-painted Sanskrit storybooks prepared by the students as part of their Internal Assessment.

The students were assigned selected stories from classical Sanskrit literature such as the Ramayana, Mahabharata, Panchatantra, Hitopdesha, and Jataka Katha. Sanskrit has been introduced by the College, along with Marathi and Hindi, in accordance with the NEP 2020 framework.



# संस्कृत कथांची मेजवानी

**गायत्री देव,** पोदार कॉलेज (कॉलेज क्लब रिपोर्टर)

माटुंग्याच्या **आर. ए. पोदार वाणिज्य आणि अर्थशास्त्र स्वायत्त महाविद्यालया**नं द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात मराठी, हिंदी आणि संस्कृत या तिन्ही भाषांचा समावेश केला आहे. याच पार्श्वभूमीवर पोदार कॉलेजनं अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमातून 'भव्य संस्कृत कथापुस्तक निर्मिती' प्रकल्प हाती घेतला. विशेष बाब म्हणजे तब्बल ११२ विद्यार्थांनी या प्रकल्पात सहभाग घेतला होता. प्रत्येक विद्यार्थ्याला रामायण, महाभारत, पंचतंत्र, हितोपदेश आणि जातक कथा यामधील एक कथा देण्यात आली होती. त्या कथा संस्कृत भाषेत लिहून सर्व कथापुस्तकं हातानं तयार करण्यात आली आणि त्यामध्ये हातानं रंगवलेली चित्रं होती, यामुळे भाषा आणि शाश्वततेचा संगम साधणारी पर्यावरणपूरक पुस्तकं तयार झाली.

जातक कथांपासून ते सिंह-माकडाच्या गोष्टीपर्यंत आणि अभिमन्यूच्या बलिदानापासून ते लक्ष्मणाच्या बंधुप्रेमापर्यंत प्रत्येकानं वेगवेगळी कथा आणि तात्पर्य सोपं करून सांगितलं. हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विषय शिक्षिका प्रज्ञा नाडकर्णी यांच्या सक्षम नेतृत्वांतर्गत यशस्वीरित्या पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक ज्ञान आणि संस्कृतीशी जोडले जाण्याची उत्तम संधी मिळाली.



"नवीन शैक्षणिक पद्धतीमुळे घडून आलेल्या या संस्कृत उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलेली ही अप्रतिम पुस्तकं पोदार कॉलेजनं दत्तक घेतलेल्या बऱ्हाणपूर येथील आदिवासी भागातील मुलांना भेट देण्याचा मानस आहे.

**– डॉ. विनिता पिंपळे**, प्राचार्या, पोदार कॉलेज